# कोळशाच्या कमतरतेमुळे खापरखेडयाच्या संच क्र.२ चे वीज उत्पादन खंडित

कोल इंडियाकडून होणाऱ्या कोळशाच्या कमतरतेमुळे महानिर्मितीच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेच्या संचातून वीज उत्पादन खंडित झाले आहे. खापरखेडा वीज केंद्राच्या ५ संचांकरिता दररोज २५००० मेट्रीक टन कोळशाची आवश्यकता असते मात्र दररोज साधारणत: १३००० मेट्रीक टन इतकाच कोळसा पुरवठा होत असल्याने कोळशा अभावी ४ ऑक्टोबर पासून खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक २ तात्पुरता बंद ठेवण्याचा निर्णय महानिर्मिती व्यवस्थापनाने घेतला आहे.

खापरखेडा वीज केंद्राला वेकोली, महानदी कोल लिमिटेड, साउथ इस्टर्न कोल लिमिटेड द्वारे कोळसा पुरवठा करण्यात येतो. कोळशा अभावी उद्‍भवलेल्या परिस्थितीवर बारिक नजर ठेऊन वीजनिर्मितीवर विपरित परिणाम होणार नाही याची काळजी महानिर्मितीकडून घेण्यात येत आहे. सोबतच , पुरेसा कोळसा उपलब्ध व्हावा यादृष्टीने नियमित पाठपुरावा देखील सुरू आहे.